Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# राष्ट्रीय शिक्षण धोरण -2020 मधील अपेक्षित समग्र प्रगतीपत्रकाचा (HPC) चिकित्सक अभ्यास

**वैभव विश्वासराव देवरे,** संशोधक,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
**डॉ. कैलास संतोष चौधरी,** सहयोगी प्राध्यापक, नंदुरबार तालुका विधायक समितीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार

**प्रस्तावना** :

मानवाच्या अंगी असलेल्या पूर्ण क्षमतांचा वापर करता येण्यासाठी ,समान व न्याय्य समाज विकसित करण्यासाठी राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. भारता सारख्या विकसित देशांच्या प्रगतीसाठी, आर्थिक विकास, सामाजिक न्याय, समानता, राष्ट्रीय एकात्मता व संस्कृती दर्शन या सर्वच क्षेत्रांत वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण देणे महत्त्वाचे आहे. याच उद्देशाने प्रत्येक राष्ट्र आपले स्वतंत्र 'राष्ट्रीय शिक्षण धोरण 'ठरवत असतात.

भारतात पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण 1968 व दुसरे शिक्षण धोरण 1986 ला राबविण्यात आलेत. त्यानंतर या धोरणात 1992 मध्ये दुरुस्ती केली गेली. त्यानंतर आजतागायत धोरणात आमूलाग्र बदल झाला नाही. राष्ट्रासमोर नवीन आव्हाने, संधी, निर्माण होत आहेत. परंतु या संधीचा पुरेपूर फायदा करून घेण्यासाठी नागरिकांना कुशल बनवणे अंत्यत गरजेचे आहे या बाबींचा आढावा घेऊन तिसरे राष्ट्रीय शिक्षण धोरण - 2020 राबविण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP-2020) च्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की, "मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी, समान आणि न्याय्य समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे". जर हा पाया मजबूत करावयाचा असेल तर त्यासाठी शिक्षण प्रशिक्षण मजबूत होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशाच्या शिक्षणव्यवस्थेवर अवलंबून असते. शिक्षण जेवढे प्रभावी व दर्जेदार असेल तेवढेच प्रभावी व दर्जेदार विकास हा व्यक्ती, समाज, देशाचा होईल.

भारताने २०१५ मध्ये शाश्वत विकासाचे उद्दिष्ट हाती घेतले आहे व ते २०३० पर्यंत साध्य करण्यासाठी विविध कृती कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यात जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रमाचा समाविष्ट करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट सर्वांसाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देणे निश्चित करण्यात आले आहे. यासाठी या कार्यक्रमांतून प्रयत्न केले जात आहेत. परंतू या सर्व बाबी तेव्हाच साध्य होतील जेव्हा खऱ्या अर्थाने शिक्षण प्रक्रिया दर्जेदार, गुणवत्तापूर्ण होईल.

शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षक प्रशिक्षण असायला हवे. यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षक प्रशिक्षणावर विशेष भर देण्यात आला. शिक्षक प्रशिक्षणाचे स्वरुपच बदलण्याचा प्रयत्न या धोरणातून करण्यात आला आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

जर शिक्षणप्रणाली राष्ट्राच्या उद्दिष्टांनुसार आणवयाची असेल तर त्यासाठी शिक्षणातील मूल्यमापनाचा दर्जा वाढवणे आवश्यक आहे. ह्याच हेतूने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये समग्र प्रगतीपत्रकाचा समावेश करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबर कौशल्यांचा विकास होणे खूप महत्त्वाचे आहे. याचा विचार समग्र प्रगतीपत्रकात होणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अपेक्षित आहे.

प्रस्तुत संशोधन लेखातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अपेक्षित असलेले समग्र प्रगतीपत्रकाचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. समग्र प्रगती पत्रक नेमके काय आहे? समग्र प्रगतीपत्रकाची उद्दिष्टे कोणती आहेत? समग्र प्रगतीपत्रकाची गरज व महत्त्व नेमकी कोणती आहेत? समग्र प्रगतीपत्रकाची स्तर कोणते आहेत? असे विविध प्रश्न शिक्षकांच्या मनात निर्माण होत असतात. या प्रश्नांची उततरे चिकित्सकपणे मांडण्यासाठी प्रस्तुत संशोधन लेख तयार करण्यात आला व तयातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तून समग्र प्रगतीपत्रकाकडून असलेल्या अपेक्षा याबाबतीत सखोल चर्चा व माहिती मिळविण्याच्या दृष्टिने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील समग्र प्रगतीपत्रका संबंधित तरतूदींचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत संशोधन लेखमधून मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**समग्र प्रगतिपत्रक (Holistic Progress Card) संकल्पना :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP-2020) च्या परिच्छेद 4.35 नुसार सर्व विद्यार्थ्यांना शाळा आधारित मुल्यांकन प्रदान करण्यासाठी समग्र प्रगती 360° या बहुआयामी अहवाल सादर होईल. यात विद्यार्थ्यांच्या बोधात्मक, भावात्मक आणि क्रियात्मक क्षेत्रातील प्रगती तपशीलवार दर्शवली जाईल. शिक्षकाच्या मुल्यमापनासह स्वंयमुल्यमापन आणि सहाध्यायी मूल्यांकन यांचा समावेश होईल. त्याचप्रमाणे प्रकल्प आणि अन्वेषणावर आधारित अध्ययन, प्रश्नमंजुषा, नाट्यीकरण, सांघिक कार्य, पोर्टफोलिओ, इ. मध्ये विद्यार्थ्यांनी केलेली प्रगती या सर्वांचाच समावेश असेल. सर्वांगीण प्रगती पुस्तक हे घर व शाळा यामधील महत्वाचा असेल. पालक व शिक्षक यांच्या बैठकीत संबंधित प्रगती पत्रक सादर केले जाईल. व पालकांना सक्रीयपणे सहभागी करून घेता येईल. विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या मदतीची माहिती देण्यात येईल.

**समग्र प्रगतिपत्रक (HPC) व राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020 :-**

बालकांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून भारतीय शिक्षणाचे पुनरुज्जीवन करणे हे राष्ट्रीय शिक्षण धोरण -2020 चे उद्दिष्ट आहे.या धोरणात बालकांच्या क्षमतांची वाढ व अध्ययनासाठी बहुआयामी दृष्टीकोन रुजवण्यावर भर देण्यात आला आहे.बालकांच्या बौद्धिक, भावनिक, सामाजिक व शारीरिक क्षेत्रांचा सर्वांगीण विकास समाविष्ट आहे.या प्रक्रियेवर मार्गदर्शन करण्यासाठी राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र,परख (PARAKH-Performance, Assessment, Review, and Analysis of Knowledge for Holistic Development ) ची स्थापना केंद्र स्तरावर करण्यात आली आहे.या उपक्रमांचा भाग म्हणून समग्र प्रगतीपत्रक संकल्पना मांडली आहे.

पारंपारिकपणे मूल्यमापन परीक्षेच्या आधारावर वर्षाच्या शेवटी करण्यात येते व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे समग्र चित्र स्पष्ट होत नाही . विद्यार्थ्यांना मानसिक दडपण आले असते.गुण जास्त मिळवण्यासाठी घोकंपट्टी वर भर दिला जातो.यातुन योग्य मूल्यमापन होतांना दिसत नाही. संपुर्ण शैक्षणिक प्रवासातील गुणवत्तेकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020 मध्ये समग्र प्रगतीपत्रक हि संकल्पना मांडली आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

**समग्र प्रगतीपत्रक - व्याख्या**

1. समग्र प्रगतीपत्रक म्हणजे अभ्यासक्रमातील क्षेत्रे,ध्येये क्षमता, अध्ययन निष्पत्तीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या मूल्यांकन विषयी सर्वंकष माहिती देणारा दस्तऐवज होय.
2. समग्र प्रगतीपत्रक हे विद्यार्थ्यांना अध्ययन क्षेत्रातील संपादित क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती चा वैयक्तीक व सर्वसमावेशक अहवाल.

**1. समग्र प्रगतीपत्रक -उद्दिष्टे**

1) विद्यार्थ्यांची संपादणूक प्रभावीपणे समजून घेणे
2) विद्यार्थ्यांची आवश्यकता नुसार उपचारात्मक अध्यापन, कृती कार्यक्रम अंमलबजावणी करणे.
3) समग्र प्रगतीपत्रक प्रमाणे विकासात्मक क्षेत्र किंवा संपादणुकीचे स्तर निश्चित करणे.
4) विद्यार्थ्यांची संपादणूक कुटुंबा पर्यंत पोहोचवणे
5) उपक्रम, कृती, प्रकल्प सादरीकरण या बाबतीत सहाध्यायी सोबत चर्चा, प्रतिक्रिया घेणे.
6) समग्र प्रगतीपत्रक यामुळे विद्यार्थी कोणत्या स्तरावर आहे हे पाहता येईल.
7) समग्र प्रगतीपत्रकामुळे शारीरिक, मानसिक भावनिक सामाजिक व आरोग्य विषयक सवयी या बाबतीत लक्ष दिले जाईल.
8) समग्र प्रगतीपत्रक यामुळे विद्यार्थी प्रगती गुणांऐवजी संपादणूक चे चित्र स्पष्ट करता येईल.

**2. स्तर निहाय समग्र प्रगतीपत्रक**

| अ.क्र. | स्तर | इयत्ता व वर्षे |
|---|---|---|
| 1 | पायाभूत स्तर. (Foundation Stage) | बाल वाटिका -1,2,3, आणि इयत्ता पहिली व दुसरी (5 वर्षे) |
| 2 | पुर्वतयारी (Preparatory Stage) | इयत्ता तिसरी व इयत्ता पाचवी (3 वर्षे) |
| 3 | पूर्व माध्यमिक स्तर (Middle Stage) | इयत्ता सहावी ते इयत्ता आठवी (3 वर्षे) |
| 4 | माध्यमिक स्तर (Secondary Stage) | इयत्ता नववी ते इयत्ता बारावी (4 वर्षे) |

वरिलप्रमाणे राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020 मधील शिक्षणाच्या आकृतीबंध स्तर निहाय समग्र प्रगतीपत्रक चे नमुने वेगवेगळे राहणार आहेत.सदर नमुना राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र परख यांच्या मार्फत विकसित करण्यात आले आहे.व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी भाषांतर करून उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**समग्र प्रगतीपत्रक गरज व महत्त्व :**

1) समग्र प्रगतीपत्रक विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा प्राथमिक स्त्रोत तयार होईल.
2) समग्र प्रगतीपत्रक यामुळे विद्यार्थी ची समज किती आहे हे पाहता येईल.
3) समग्र प्रगतीपत्रक यामुळे विद्यार्थी ची प्रगती पालकांना समजु शकेल.व पालक सभेत संपादणूक वर संवाद साधता येईल.
4) शाळा व कुटुंब यातील दुवा म्हणून समग्र प्रगतीपत्रक काम करेल.
5) बौद्धिक भावनिक सामाजिक शारीरिक इत्यादी सर्वंकष मूल्यमापन करता येईल.
6) स्वयं मूल्यांकन, सहाध्यायी मूल्यांकन व पालक अभिप्राय याद्वारे प्रभावी होते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

7) विद्यार्थ्यांची आवड निवड , शिकलेल्या बाबी,सवयी, वेळेचे व्यवस्थापन याबाबत विचार मंथन करून नोंदी करता येतील.

**समारोप :**

प्रस्तुत संशोधनातून राष्ट्रीय शिक्षण धोरण -2020 मधील अपेक्षित समग्र प्रगतीपत्रकाचा (HPC) चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्याचे मूल्यमापन योग्य होणे अपेक्षित आहे. त्या दृष्टिने राष्ट्रीय शिक्षण धोरण -2020 समग्र प्रगतीपत्रकाचा विचार मांडण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचा समग्र विकासाचे मूलयमापन स्तरानुसार योग्य व अचूक होण्यासाठी अपेक्षा यातून आहेत. त्याचे जर प्रत्यक्ष अंमलबजावणी व्यवस्थित झाली तर यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास निश्चितच साधणे शक्य होईल.

**संदर्भ सुची :**

1. राष्ट्रीय शिक्षण धोरण -2020 , शिक्षण मंत्रालय,भारत सरकार दिल्ली
2. शिक्षक क्षमतावृद्दी प्रशिक्षण 2.0, शिक्षक मार्गदर्शिका, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, महाराष्ट्र
3. https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/2020/MARATHI.pdf
4. https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf
5. https://idronline.org/nep-2020-hits-and-misses/
6. https://timesofindia.indiatimes.com/blogs/edutrends-india/nep-2020-empowering-the-teacher/
7. https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=1847066


Copyright © | JET Network, All Rights Reserved